**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ :-५४०२/२०२३/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अब्दूल कादर फक्रुद्दीन मुजावर | १) नायब तहसिलदार महसूल, महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर<br>२) ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | १) तहसिलदार महसूल, महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर<br>२) विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती पंढरपूर, जि. सोलापूर |

**( सुनावणी दिनांक - २१/०७/२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.२८.०८.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.१९.०९.२०२२ च्या माहिती अर्जात मौजे करकंब, ता.पंढरपूर जि.सोलापूर या गावात मुस्लिम कब्रस्तानची एकुण किती संख्या असून त्या त्या कब्रस्तानचे नाव, स्थापना वर्ष, कब्रस्तानची एकूण जागा गुंठयामध्ये, सर्व्हे नं. आणि दि. ०१.०१.२००५ ते ०१.०९.२०२२ पर्यंत किती मयताचा अंत्यविधी कोणत्या कब्रस्तानमध्ये केला गेला याबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत करकंब यांनी अवगत केले की, “माहिती तयार आहे ती देणेची कार्यवाही करणेत येईल.”

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, “अपिलार्थी यांचे प्रथम अपील दि.०८.२.२०२३ च्या पत्राने प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंढरपूर यांना पुढील कार्यवाही करण्यासाठी पाठविणेत आले आहे.”

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार महसूल,महसूल शाखा जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांनी दि.१३.१०.२०२२ च्या पत्राने माहिती अर्ज ग्राम विकास अधिकारी, करकंब ग्रामपंचायत ता.पंढरपूर यांना वर्ग केला आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत करकंब ता.पंढरपूर यांनी माहिती तयार आहे देणेची कार्यवाही करण्यात येईल असे सुनावणी वेळी सांगितले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती पंढरपूर, जि. सोलापूर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ५४०२/२०२३/ सोलापूर 1533/2025 दिनांक - 15/10/25